**पुस्तक ओळख**

# संवेदनशीलतेचं रसायन अंगभर गोंदवणारा संग्रह

उर्मिला पवार




लेखिका मुंबईस्थित असून त्यांचे 'आयदान' हे आत्मकथन व 'आम्हीही इतिहास घडवला' (आंबेडकरी चळवळीतील स्त्री योगदानाचा वेध) ही मैलाचा दगड मानली गेलेली पुस्तके आहेत.
ईमेल- pawar.urmila@yahoo.com

मोहन शिरसाट यांचा पहिलाच कवितासंग्रह असलेल्या 'नाही फिरलो माघारी'तील कविता वाचताना हिंदीतले प्रतिभावंत (प्रति म्हणजे दुसरा आणि भा म्हणजे प्रकाश दाखवणारा) म्हणूनच ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कवी गुलजार यांच्या एका वाक्याची आठवण होते. गुलजार म्हणाले 'मै नज्मे लिखता हुं और पेडपर सुखाने डालता हुं।' म्हणजे आपल्या कविता नीट वेळ देऊन त्या अनेकांगांनी परिपूर्ण झाल्याशिवाय मी प्रसिद्ध करीत नाही. कवी शिरसाट यांनीही अशाच अगदी पक्क्या झालेल्या आपल्या कविता वाचकांसमोर ठेवल्या आहेत. मुळात शिरसाट शिक्षक आहेत. खेड्याशी, शेताशी, मातीशी त्यांच घट्ट नातं आहे. जातीतून आलेले उपेक्षेचे, वंचनेचे अनुभवही त्यांच्या गाठीशी आहेत त्यातूनच शिरसाट यांनी आजूबाजूला डोळसपणे पहाण्याची ताकद आणि वाचन, मनन, चिंतनातून अफाट शब्दसंग्रहही प्राप्त केलेला आहे. सर्वात महत्त्वाचं हे की ते अतिशय संवेदनशील माणूस आहेत. हे सर्व रसायन अंगभर गोंदून त्यांची प्रत्येक कविता आपल्या समोर आलेली आहे.

'नाही फिरलो माघारी' हे कविता संग्रहाचं नावच अतिशय दमदार आहे. त्या नावाच्या ध्वन्यार्थातूनच आतील कवितांचा लक्षार्थ आपल्या लक्षात येतो. कितीही वाईट परिस्थिती असली तरी मी पुढेच जात राहिलो आणि जाणार आहे हा कवीचा ठाम आवाज यातून व्यक्त होतो. खर तर शीर्षकातूनच कवीचं व्यक्तिमत्व आणि ते काय सादर करणार आहेत याची झलक आपल्याला दिसते. आपल्या पहिल्याच कवितेत ते 'मायनस मायनस प्रतलातले जीणे' दाखवत तिथल्या श्रमिकांच्या कष्टकऱ्याच्या श्रमाचं चीज व्हावं, त्यांचे हक्क अधिकार त्यांना सन्मानपूर्वक मिळावे ही मनातली आस व्यक्त करत आहेत. फुलनदेवीच्या निमित्ताने तिच्यावर झालेल्या अत्याचाराचा सल कवीच्या मनात आहे. त्यातून समग्र स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या वेदनेशी हे कवीमन एकरूप झालेल आहे.

कविता या साहित्याच्या शाश्वत फॉर्मवर शिरसाट यांचं प्रेम आहे. त्यांच्या भूमिकेत कविता श्रेष्ठ आहे.ते नमूद करतात की थोर थोर व्यक्तीना आपलं मन मोकळं करताना कवितेचा आधार घावा लागतो आणि ते खरंही आहे कारण कविता हा एक उद्‌गार आहे. हृदयात उमटलेल्या भावनांचा तो एकसंघ कल्लोळ आहे. अतिशय संक्षिप्तपणे फार मोठा आशय सामावून घेण्याची ताकद कविता या फॉर्ममध्येच आहे. अथांग समुद्राची चव एका थेंबात सामावते तसा कवितेतून

जीवनाचा प्रत्यय देता येतो हे या कवीला उत्तम उमगलेलं आहे. शिरसाट यांच्या कविता अनेक आशय विषयांनी प्रकट झाल्या आहेत आणि त्यातून प्रत्येक वेळी प्रकट होतो तो निर्धार. कितीही बिकट परिस्थिती आली तरी न्यायासाठी प्रेरित झालेलं त्यांच मन आव्हानाच्या आखाड्यात दंड थोपटून उभं आहे. ते म्हणतात,

मग आभाळ कोसळेल तरीही
मेंदूच्या वलयांकित वळ्यापुळ्या सुद्धा
भयकंपित होणार नाहीत यत्किंचितही

कवीकडे फार मोठी ताकद आहे ती उपमा, प्रतिमा आणि प्रतिकांचा अचूक वापर करण्याची. कवितेचा मार्ग सरळ नसतो. कविता प्रतिमा आणि प्रतीकांच्या आडवळणानं वाचकाला झुकांड्या देत लपतछपत पुढे जाते. प्रतीक आणि प्रतिमांमध्ये अनेक घटना, घटितं, गोष्टींचं बीज संक्षिप्त रूपात अंकुरलेलं असतं. रसिकाला सावधपणे माग काढत अर्थ शोधत जावं लागतं. तेव्हाच कवीच्या भावनेशी एकरूप होऊन मन शांत होतं तर कधी विस्कटूनही जातं पण त्यातून कवीनं बांधलेलं अर्थाचं तोरण रसिकांना नव्या शब्दांचा परिचयही देतं. कवितेचे हे सर्व बारकावे शिरसाट पूर्णपणे जाणून आहेत. आपल्या कवितेत त्यांनी प्रतिमा आणि प्रतीकांची तोरणं जागोजागी बांधली आहेत. त्यातून त्यांची कविता वाचकांना थेट भिडते.

शिरसाट यांची कविता तत्त्वज्ञान, इतिहास, गाव, शहर, वर्ण, वर्ग, जात इत्यादींना स्पर्शून अगदी प्रेमबंधही उलगडून पुढे जाते. त्यांची समग्र झेप बघून मला आणखी एका प्रतिभावंत कवी सुरेश भट यांच्या कवितेची ओळ लिहाविशी वाटते, गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा, रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा. मोहन शिरसाट यांच्या कवितांचा बाजही असाच आहे. अगदी पहिलाच काव्यसंग्रहाची इतकी सहज सुंदर निर्मिती केल्याबद्दल कवी मोहन शिरसाट यांचे मनापासून कौतुक आणि खूप खूप शुभेच्छा.

●

नाही फिरलो माघारी (कवितासंग्रह), मोहन शिरसाट ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पृष्ठे :११४, किंमत : १३० रु.

---

## शब्द आणि भाषा (पान नं ५३ वरून)

अतिक्रमणाने धोक्यात आला आहे. वन्यप्राण्यासाठी राखलेल्या अभयारण्यात लोक सहलीला जाऊ शकतात पण तिथल्या विश्रामगृहात वातानुकूलित निवास आणि पंचतारांकित उपहारगृहे अशा सोयी असल्या तरच!

जंगलांची जागा आता महानगरातील काँक्रीट जंगलांनी घेतली आहे आणि माणसांच्या गर्दीत असतानाही स्थलांतरित व्यक्ती एकाकी जीवनच जगतात. वने दुर्मिळ होत असली तरी इमारतींच्या जंगलात आणि माणसांच्या अखंड प्रवाहातही नीरव वनवास शक्य नसला तरी विजनवासाची वाढती सोय होतेच आहे.

●

---

## सिद्धांतकर्ते अनिकेत जावरे यांचे जाणे... (पान नं ५८ वरून)

म्हणून किंवा गृहीत धरण्यासाठी म्हणून किंवा चर्चा करण्यासाठी किंवा विवेचनासाठी म्हणूनदेखील वाचन करू नका. तर वाचन करा समर्थ होण्यासाठी, स्वतंत्रपणे विचार करण्यासाठी वाचन करा.'' अशा विचारांच्या प्रभावातून जावरेसरांना आपली वेगळी ओळख निर्माण करता आली. त्यांची हीच दृष्टी अभ्यासकाला प्रेरणादायी ठरणारी आहे.

●